- विधानसभा/विधानपरिषद प्रश्न व उत्तरे, कपात सूचना, लक्षवेधी सूचना, आश्वासन
- कामकाज मान्य आदेश
- तपासणी अहवाल
- आवक जावक नोंदवही
- लेखन सामुग्री मागणीपत्र
- बदली आदेश
- बढती आदेश
- नियमनाधीन नियमावली संदर्भातील संदर्भ
- जी.डी.सी.व ए. व खाते परीक्षा निकालपत्र
- परीक्षा नियंत्रक पत्रिका (वेळापत्रक, निकालपत्रक)
- नियोजन अंदाजपत्रक.
- कार्यभार हस्तांतरण
- प्रमाणित लेखापरीक्षक यांना मंजूर केलेल्या मान्यतेचे आदेश
- सहकार सप्ताह कामकाज बाबत

**मुद्दा क्रमांक:-७(सात)** - आपले धोरण तयार करण्याच्या किंवा त्यांची अंमलबजावणी करण्याच्या संबंधात लोकांशी विचार विनिमय करण्यासाठी किंवा लोकांकडून निवेदन केले जाण्यासाठी अस्तित्वात असलेल्या व्यवस्थेचा तपशिल.

प्राप्त झालेल्या धोरणात्मक बाबींवर सूचना तसेच कायद्यातील दुरुस्तीबाबतचे प्रस्ताव शासनास मान्यतेसाठी सादर करण्यात येतात. अंतिम मान्यता विधीमंडळाद्वारे होते.

**मुद्दा क्रमांक:-८(आठ)-**

आपला एक भाग म्हणून किंवा सल्ला देण्याच्या प्रयोजनासाठी म्हणून घटीत केलेल्या दोन किंवा अधिक व्यक्तींच्या मिळून बनलेल्या मंडळाचे परिषदांचे, समित्यांचे आणि अन्य निकायांचे विवरण आणि त्या मंडळाच्या, परिषदाच्या समित्यांच्या आणि अन्य निकायांच्या बैठकीत लोकांसाठी खुल्या आहेत किंवा कसे अशा बैठकीची कार्यवृत्ते जनतेला पहावयास मिळण्याजोगी आहेत किंवा कसे याबाबतचे विवरण.

तालुक्यातील अडचणीतील नागरी सहकारी बँका/पतसंस्थांमधील ठेवीदारांच्या ठेवी परत करण्यासाठी ठोस कार्यवाही करण्याच्या अनुषंगाने करण्यात येणाऱ्या कार्यवाहीस गती देण्यासाठी सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभागाकडील शासननिर्णय क्रमांक युआरबी-२५०७/विकास/प्र.क्र. ६७/७-स, दिनांक २३/०८/२००८ अन्वये जिल्हास्तरीय कृती समिती स्थापन करण्यात आलेली आहे. सदर समिती मा. जिल्हाधिकारी यांचे अध्यक्षतेखाली कामकाज करते.

महाराष्ट्र राज्य सावकारांच्या व्यवहाराचे नियमनाकरिता महाराष्ट्र सावकारी (नियमन) अधिनियम २०१४ हा कायदा दिनांक ८ एप्रिल २०१४ रोजीच्या अधिसूचनेद्वारे प्रसिद्ध झालेला आहे. महाराष्ट्र शासनाने दिनांक ९ सप्टेंबर २०१४ रोजीच्या अधिसूचनेद्वारे ज्या क्षेत्रामध्ये निबंधक आपल्या अधिकाराचा वापर करतील व आपली कर्तव्ये पार पाडतील ते क्षेत्र म्हणून निश्चित केले आहे. सावकाराने दिलेल्या कर्जावर एका वर्षात किती व्याजदर आकारण्याबाबतची महाराष्ट्र शासनाने १६ सप्टेंबर २०१४ रोजी अधिसूचना प्रसिद्ध केली आहे. सदर कायद्यांतर्गत ज्या ठिकाणी बेकायदेशीर सावकारी व्यवसाय केला जातो त्या क्षेत्रातील सावकारांविरुद्ध कलम १६ अन्वये कारवाई करून सावकारी व्यवहारांची सर्व कागदपत्रे जप्त करण्याचा अधिकार निबंधकांना दिला आहे. संपादित केलेल्या स्थावर मालमत्तेची विक्रीव्यवहार रद्द करण्याचा अधिकार कलम १८ नुसार निबंधकांना दिला आहे. सावकारी संदर्भात प्राप्त होणाऱ्या लेखी/ऑनलाईन तक्रारींवर चौकशी करून कार्यवाही करण्याचा अधिकार निबंधकांना आहे.

महाराष्ट्र मालकी हक्काच्या सदनिकांबाबत (त्या बांधण्यास प्रोत्साहन देणे, त्यांची विक्री, व्यवस्थापन व हस्तांतरण यांचे नियमनाबाबत) अधिनियम १९६३ चे कलम ११ अन्वये गृहनिर्माण संस्थांनी त्यांचे ७/१२ उतारे, प्रॉपर्टी कार्डवर व प्रवर्तक,विकसक, जमिन मालक नांव लावून देण्यास कसूर करतात अशा व्यक्ती विरुद्ध या कार्यालयाकडे दाखल केलेल्या अर्जावर सुनावणी करणे व आदेश पारीत करण्याचे कामकाज चालविले जाते. जेथानिहाय गृहनिर्माण संस्थांनी सर्व कागदपत्रे केल्यानंतर दोन महिन्यांचे आत अर्जाशी संबंधित त्रुटींची पुर्तता संस्थेस कळविणे, अथवा अर्जामध्ये त्रुटी नसल्यास सुनावणी

C:\Users\ADMIN\Downloads\mahiti_adhikar_2017_1_to_17_prasidth 18.8.2018.doc

